# पर्यटकांचा एक मुक्काम वाढवा-कोल्हापूरमध्ये १० अब्ज उलाढाल वाढवा



**श्री.अभिजीत मगदूम**
भीमा बिल्डर्स

कोल्हापूरच्या सर्वांगिण विकासाकरिता आपण काय करू शकतो याचा विचार करताना आपल्या लक्षात येईल की अनेक नवनविन प्रकल्प, कल्पना अमलात आणता येतील. परंतु त्याच बरोबर किंवा त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे कोल्हापूरच्या धार्मिक, ऐतिहासिक वारसा समृद्धी व त्याचे श्रेय योग्य प्रझेंटेशन किंवा मार्केटिंग गरजेचे आहे. या संवर्धनातूनच कोल्हापूरचा व्यापार उदीम, पर्यटन संबंधित व्यवसाय, येथील स्थानिक उत्पादने, पारंपारिक लोककला, ऐतिहासिक मर्दानी खेळ, कोल्हापूरी या विशिष्ठ चवीने प्रसिद्ध असलेली खाद्य संस्कृती याला नवी झळाळी मिळेल.

साडेतीन शक्तिपीठापैकी एक असलेले करविर काशी म्हणून देशविदेशात ओळखले जाणारे आपले कोल्हापूर एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून नावा रूपाला येणे गरजेचे आहे. छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने पुनित झालेला हा जिल्हा येथील लोकराजे छत्रपती शाहू महाराज यांच्या सामाजिक समतेचा आदर्शच आहे. या धार्मिक व ऐतिहासिक महात्म्यामुळे दरवर्षी लाखो पर्यटक येथे येत असतात.

या वर्षी नवरात्रीच्या कालावधीमध्ये साधारणत: दहा लाख पर्यटकांनी कोल्हापूरला भेट दिली. वर्षभरामध्ये साधारणत: याच्या कितीतरी पट अधिक पर्यटक कोल्हापूरला भेट देतात. पण यापैकी बहुतांश पर्यटक त्याच दिवशी कोल्हापूरातून माघारी जाणे पसंत करतात किंवा तेथे न थांबता गोवा, कोकण किंवा इतर ठिकाणी मार्गस्थ होतात.

आजमितीस कोल्हापूरच्या विकासाच्या दृष्टीने या पर्यटकांनी कोल्हापूरातच एक दोन दिवसाचा मुक्काम वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कोल्हापूरमध्ये एक दिवसाचा जरी मुक्काम वाढला तर प्रत्येक पर्यटकामागे त्याचे राहणे, जेवणे, प्रवास (शहरांतर्गत) येथील स्थानिक गोष्टींची खरेदी, करमणूक अशी सरासरी कमीत कमी रू.२००० ची उलाढाल येथे वाढणार आहे. समजा वर्षातून पन्नास लाख पर्यटक कोल्हापूरात येत असतील तर या अंदाजाप्रमाणे फक्त आपण त्यांचा एक दिवसाचा मुक्काम वाढवू शकलो तर आपण दहा अब्ज रूपये एवढा मोठा व्यापार करून आपल्या कोल्हापूरच्या विकासात भर घालू शकतो.

पण यासाठी काही मूलभूत गोष्टींमध्ये सुधारणा करणे गरजेचे आहे. यापैकी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बाहेरून आलेल्या पर्यटकांना येथे येणे व राहणे सोयीचे व आनंददायी वाटले पाहिजे.

कोल्हापूरचे आल्हाददायी वातावरण येथील प्रसिद्ध खाद्यसंस्कृती, कोल्हापूरी लोकांचे आदरातिथ्य या गोष्टी त्यांना आकर्षित करतातच परंतु पर्यटन वाढीसाठी पायाभूत सुविधा आंतरराष्ट्रीय स्तराच्या असणे गरजेचे आहे.

यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे येणाऱ्या भाविकांना महालक्ष्मी मंदिरापर्यंत प्रशस्त व दर्जेदार रस्ते व ऐसपैस पार्किंग उपलब्ध करून देणे तातडीने गरजेचे आहे. महालक्ष्मी मंदिर व परिसर याच्या विकासाकरिता एक आंतरराष्ट्रीय दर्जाला साजेसा आराखडा व त्या सोबतची विकासकामे त्वरीत होणे गरजेचे आहे. येथे आलेल्या पर्यटकांनी पुढील कांही दिवस मुक्काम कोल्हापूरातच करावा या दृष्टीने पुढील कांही गोष्टी करता येतील.

**हेरिटेज वॉक :**

जगभरामध्ये अनेक शहरांमध्ये शहराचा सांस्कृतिक व ऐतिहासिक ठेवा असणाऱ्या अनेक इमारती, स्थळे असतात. या स्थळांना भेट देणे व त्या भागाची ऐतिहासिक/सांस्कृतिक जडणघडण अभ्यासणे हा पर्यटकांच्या आवडीचा विषय आहे. याबाबतीत तर कोल्हापूर अत्यंत समृद्ध आहे. आपल्या शहरामध्ये अशाप्रकारे अमुल्य ठेवा असणाऱ्या साधारणत: ८१ हेरिटेज इमारती आहेत. दुर्दैवाने आजमितीस या सर्व गोष्टींची माहिती पर्यटकांना होणे तर दुरच पण बहुतांश स्थानिक लोकांनाही नाही. अगदी थोडक्या बजेटमध्ये या सर्व हेरिटेज इमारतींची साफसफाई, डागडुजी केल्यानंतर याची परिपूर्ण माहिती असलेल्या प्रशिक्षित बहुभाषिक गाईड सोबत अनेक देश विदेशातील पर्यटक यामध्ये आनंदाने सहभागी होतील. सरकारी पातळीवर बजेटमध्ये खूपच कमी बोजा टाकून सुरू होऊ शकणारा हा प्रकल्प म्हणजे कोल्हापूरच्या पर्यटनामध्ये एक मोठे दालन उघडेल यात शंका नाही.

**मेड इन कोल्हापूर मॉल :**

देशविदेशातून आलेल्या पर्यटकांना येथिल स्थानिक गोष्टी, वैशिष्ठये याचे आकर्षण असते. कोल्हापूर हे कलापूर म्हणूनपण ओळखले जाते व यामुळेच प्रत्येक क्षेत्रामध्ये येथिल उद्योजकांनी आपली छाप ठेवली आहे. परंतु दुर्दैवाने याचे योग्य मार्केटींग करण्यात आपण काहीसे मागे राहिलो आहे. या सर्व वैशिष्ठयपूर्ण गोष्टी एकत्रित मिळाल्यास पर्यटक त्याचे नक्कीच स्वागत करतील. या करिता कोल्हापूरच्या स्थानिक वस्तूंना व्यासपिठ मिळावे म्हणून एक वेगळाच मेगामॉल प्रत्यक्षात आणणे गरजेचे आहे. जगभर प्रसिद्ध असलेल्या आरोग्यदायी गुळ, काकवी, गुळाची चिक्की, यासोबत त्यापासून बनणारे अनेक पदार्थ दर्जेदारपणे एका दालनात उपलब्ध असतील आणि शेजारच्या दालनात आपल्या सुगंधाने पर्यटकांना आकर्षित करणारा आजरा घनसाळ तांदूळ असेल, सुती वस्त्रोद्योगासाठी इचलकरंजीच्या साड्यांचा स्टॉल, कोल्हापूरी साज व पारंपारीक दागिन्यांचे स्टॉल, हुपरीचे अनेक चांदीचे अलंकार व भांड्यांचे दालन, महिला वर्गांना नक्कीच आकर्षित करेल. अनेक सेलिब्रिटींना भुरळ घातलेले व आरोग्यशास्त्राच्या दृष्टीने वाखाणलेल्या कोल्हापूर चप्पलांची उलाढाल येथे मोठ्या प्रमाणात होईल. कोल्हापूरात आले की कोल्हापूरी मिसळ खाणे व जेवणामध्ये तांबडा/पांढरा रस्सा पुरवणारी व शाकाहारी जेवणाची हॉटेल्सही या मॉलमध्ये एक आकर्षण बिंदूच ठरतील. पिशवीतून मिळणारे दूधच ज्यांना माहित आहे, त्यांना येथील दूध कट्टयावरून मिळणारे धारोष्ण दुध पिणे हा एक वेगळाच अनुभव ठरेल. एक स्वतंत्र दालनामध्ये उत्कृष्ठ बैठक व्यवस्था व प्रकाश योजनेमध्ये सुरू असलेले ऐतिहासिक मर्दानी खेळ पाहणे किंवा सुप्रसिद्ध मल्लांच्या लाल आखाड्यातील कुस्तीला हजेरी लावणे. हा ही एक अविस्मरणीय रोमांचक अनुभव असेल. महिला गृह उद्योगातून तयार होणाऱ्या दर्जेदार वस्तू, सांडगे/पापड, लोणची/कोल्हापूरी कांदा लसूण चटणी/ कोल्हापूरी मसाले / अनेक चटपटीत खाद्य पदार्थ/ हस्तकलेच्या वस्तू यालाही एक आंतरराष्ट्रीय व्यासपिठ मिळेल.

कोल्हापूरमधील लोककला असणारी कलापथके व लावणी, तमाशा या कार्यक्रमांची ही भुरळ पर्यटकांना नक्कीच पडेल.

**वॉकींग प्लाझा : पदपथ मार्केट :**

अनेक ठिकाणी देश विदेशामध्ये पर्यटक व स्थानिक नागरिकांना ट्रॅफिक फ्री झोन्स किंवा वॉकींग प्लाझा उपलब्ध आहेत. या ट्रॅफिक फ्री झोन्सचा सगळ्यात महत्त्वाचा फायदा म्हणजे येथे येणाऱ्या नागरिकांना वाहने नसल्यामुळे निवांत रमत/गमत शॉपिंग, हॉटेलिंग करता येते. लहान मुले मुक्तपणे बागडू शकतात. वयोवृद्ध पर्यटकांनाही निवांतपणे फिरता येते. या ठिकाणी अनेकविध वस्तु, कपडे, दागिने, स्त्रियांच्याकरिता विविध वस्तुंची दुकाने, कॉस्मेटीक शॉप्स, हरतऱ्हेचे पदार्थ मिळणारे हॉटेल्स, विविध प्रकारचे खेळ उपलब्ध असणारे गेम झोन्स यामुळे या परिसरास एक मुक्त मॉलचीच शोभा येईल. याचेकरिता कोल्हापूर मध्ये आयडीयल ठिकाण म्हणजे राजारामपूरी होय. या अभिनव संकल्पनेमुळे आलेल्या पर्यटकांचा वेळ आनंदात तर जाईलच पण त्याच सोबत येथे मोठी व्यापारी उलाढाल ही होऊ शकते. राजारामपूरीमध्ये मुख्य तीन रस्ते आहेत. यापैकी कोणतेही दोन रस्ते ट्रॅफिक करीता वनवे म्हणून वापरात आणून राहिलेल्या एका मार्गाचा याकरिता उपयोग करता येईल. फक्त बाहेरून आलेल्या पर्यटकांनाच नव्हे तर करविर वासियांनाही हा एक आनंददायी अनुभव असेल.

**कनेक्टीविटी :**

महामार्ग रेल्वे व हवाई वाहतुकीने कोल्हापूर पूर्ण जगाशी जोडले गेले आहे. कोल्हापरहून जवळच असलेल्या जयगड बंदरावरूनही आपण समुद्रमार्गे जोडले गेले आहोत. खूप दिवसांच्या प्रतिक्षेनंतर कोल्हापूर विमानतळावरून आता नियमीत प्रवासी उड्डाने होत आहेत. मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद, तिरूपती या शहरांकरीता सुरू असलेल्या सेवेला भरभरून प्रतिसाद लाभत आहे. लवकरच अहमदाबादची फ्लाईटही सुरू होईल अशी आशा आहे. विमानतळ व परिसराच्या सुधारणांचा प्रारंभ झाला असून येथे सर्वांग सुंदर हेरिटेज लुक असलेली वास्तु लवकरच उभी राहिल. त्या सोबतच विमानतळाला आवश्यक नाईट लॅण्डींगचे कामही करण्यात येणार आहे. यामुळे देश विदेशातील पर्यटकांना येथे येणे अधिक सुलभ होणार आहे.

पुणे-कोल्हापूर रेल्वे मार्गाचे दुपदरीकरण व विद्युतीकरणाचे काम वेगाने सुरू आहे. अर्थातच यामुळे रेल्वेचा वेगही वाढणार आहे. आजपर्यंत कोल्हापूर मध्ये रेल्वेचा डेडएंडच होता. परंतु आता यापुढे जाण्यासाठी कोल्हापूर वैभववाडी या मार्गाचे काम लवकरच सुरू होत आहे. घाटमाथा व कोकण जोडणारा हा रेल्वेमार्ग म्हणजे कोल्हापूरच्या प्रगतीचा नवीन अध्यायच ठरेल. कोल्हापूर व पुणे या मार्गावर प्रवास रेल्वेने करणे आजपर्यंत खूप वेळखाऊ होत आहे. यामुळे पुण्याला जाण्याकरीता प्रवासी महामार्गाचाच वापर जास्त करतात. रेल्वे मार्ग विद्युतीकरणानतर रेल्वेचा वेग वाढल्यामुळे सकाळी लवकर निघून पुण्यात ऑफिस वेळेत पोहचणे शक्य झाले तर या इंटरसिटी एक्सप्रेसला मोठा प्रतिसाद लाभेल यात शंका नाही. तसेच संध्याकाळी काम संपवून ती व्यक्ती रात्री पुन्हा कोल्हापूरला येऊ शकेल.

सातारा कागल हायवेचे सहापदरी करणाचे काम लवकरच सुरू होईल तसेच कोल्हापूरातून जाणाऱ्या नागपूर-रत्नागिरी महामार्गाचे कामही सुरू आहे. यामुळे कोल्हापूरची कनेक्टीव्हिटी अनेक पटीने वाढून कोल्हापूर देशातील एक प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून महत्त्व प्राप्त करेल यात शंका नाही.

घर शोधताय? गृहशोध वाचा !
गृहशोध
www.gruhashodh.com